# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-६७** **दिनांक - २९/०२/२०२४**

## फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये मनाई आदेश पारित केलेबाबत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात अनेक परदेशी नागरीक येतात आणि आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये विविध आस्थापनांमध्ये वास्तव्य करतात. असे निदर्शनास आलेले आहे की, यामुळे काही असामाजिक तत्वांना मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत त्यांची ओळख आणि उपस्थिती लपवुन राहण्याची संधी प्राप्त होते. त्यावर आळा घालणेकामी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१), (२) अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार बोर्डिंग हाऊस, क्लब, विश्रामगृहे (खासगी कंपनीचे विश्रामगृहांसह), पेयींग गेस्ट-हाऊस, भाडेतत्वावर मिळणारी निवासस्थाने/घरे/सदनिका /बंगले/चाळ इ., रुग्णालये/दवाखाने, व्यावसायिक होम-स्टे सुविधा (ज्या ठिकाणी परदेशी नागरिकांना आर्थिक किंवा exchange-क्रेडिट यांच्या मोबदल्यात निवास व्यवस्था उपलब्ध केली जाते), दुकाने/उपहारगृहे, सराई आणि जहाज/बोटी इ. आस्थापनांचे मालक/चालक/व्यवस्थापक यांना त्यांच्या आवारात परदेशी नागरिकांचे आगमन झाल्यापासुन २४ तासांच्या आत त्याबाबतची माहिती नजीकच्या पोलीस स्टेशन येथे देणे बंधनकारक आहे. तसेच या आस्थापणांमध्ये सध्या परदेशी नागरीक वास्तव्यास असल्यास त्याची माहिती सदरचा मनाई आदेश पारित झाल्यापासुन २४ तासाच्या आत पोलीसांना देणे बंधनकारक आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करेल तो इसम भारतीय दंड संहिता कलम १८८ प्रमाणे व इतर संबंधित कायदयांप्रमाणे शिक्षेस पात्र ठरेल. याबाबत दिनांक ०१/०३/२०२४ रोजी ००.०१ वा. ते दिनांक २८/०४/२०२४ रोजीचे २४.०० वा. या कालावधीकरीता मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात मनाई आदेश पारित करण्यात आला आहे.

----------0000----------